**<u>प्रेसनोट दि.०५/०७/२०१९</u>**

**सिंहगडरोड पोलीस पुणे**

**कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने नहे पोलीस चौकी हद्दीतील बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये पोलीसांची भेट**

---

आज दि. ०४/०७/२०१९ रोजी नहे पोलीस चौकी प्रभारी अधिकारी पोलीस उप-निरीक्षक व्ही.जे.महांगडे व पोलीस उप-निरीक्षक एस.एस.घाडगे व स्टाफ यांनी मिळून नहे पोलीस चौकी हद्दीमधील बँक ऑफ महाराष्ट्र, मानाजी नगर, नहे या शाखेत जावुन बँकेचे शाखा अधिकारी व बँक कर्मचारी यांची भेट घेतली. सदर भेटी दरम्यान बँक अधिकारी व कर्मचारी यांना पुणे पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटीं पोलीसींग संदर्भात योजना कार्यान्वीत असून त्या संदर्भात माहीती सांगण्यात आली. तसेच बँकेमध्ये भांडणे अथवा काही अडचण उदभवल्यास त्वरीत सिंहगडरोड पो.स्टे. अथवा १०० नंबरवर कॉल करुन पोलीस कंट्रोल रुम येथे कळवावे. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. आपल्या बँकेमध्ये किंवा आजुबाजूस कोणी संशयीत व्यक्ती आढळल्यास ताबडतोब पोलीसांना कळविण्यात यावे. तसेच सायबर क्राईम व ऑनलाईन फ्रॉड बाबत चर्चा करुन बँकेमध्ये येणारे नागरिकांचे पैसे सुरक्षित कसे राहतील याबाबत बँक अधिकारी व कर्मचारी यांचेशी चर्चा करुन त्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले.

